I0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** जामखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0582 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/10/2025 22:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/10/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/10/2025

**Time From (वेळेपासून):** 12:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/10/2025 **Time (वेळ):** 22:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/10/2025 22:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण, महामंडळ कंपनी मर्यादीत, शाखा कार्यालय अरणगाव,ता जामखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजु बबन आल्हाट
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाप्रवि,अनगर राइद्रप्रस्थ कलनी सावेडी,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाप्रवि,अनगर राइद्रप्रस्थ कलनी सावेडी,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420896263

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक - सुनिल रघुनाथ नागरे | | | 1. वरिष्ठ तंत्रज्ञ, लाईनमन, अरणगाव, ताजामखेड,जामखेड, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 700/रुपये त्यात 100/ रुपये | 700.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | दराच्या 07 भारतीय चलनी नोटा, | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

700.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 28/10/2025.

मी राजु बबन आल्हाट, वय-38 वर्षे, व्यवसाय-नोकरी,पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.,अहिल्यानगर रा.इंद्रप्रस्थ कॉलनी, सावेडी,ता.जि.अहिल्यानगर,मो.नं.9420896263

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की,मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक पदावर दि. 10/07/2023 पासुन कार्यरत आहे. दि. 27/10/2025 रोजी ला.प्र.वि.कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.आकाष पवार यांनी आमचेशी मोबाईलद्वारे संपर्क करुन एक लोकसेवकाविरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळवुन तक्रारदार श्री.पवार हे दि. 28/10/2025 रोजी अरणगाव,ता.जामखेड, जि.अहिल्यानगर येथे लोकसेवकाची त्यांचे कामासंबंधाने भेट घेणार असल्याचे कळविले त्याप्रमाणे तक्रारदार श्री. पवार यांना दि. 28/10/2025 रोजी सकाळी 11/00 वा. अरणगाव येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या. सदर लाचमागणीचे तक्रारीबाबत पोलीस उपअधीक्षक श्री.त्रिपुटे,ला.प्र.वि.,अहिल्यानगर यांना माहिती देवुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीशद, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच उपलब्ध करुन घेतले व त्यानंतर दोन पंच तसेच सापळा पथकातील कर्मचारी पोना/चंद्रकांत काळे,पोकाँ/किशोर कुळधर,पोकाँ/षेखर वाघ यांना कक्षामध्ये बोलावुन कळविले कि,एका तक्रारदाराने आमचेशी मोबाईलवर संपर्क करुन त्यांची एका लोकसेवकाविरोधात लाचमागणी संबंधाने तक्रार असल्याची कळवुन सदर लोकसेवकास ते दि. 28/10/2025 रोजी त्यांचे कामा संबंधाने भेटणार असल्याचे कळविले. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार भ्रश्टाचार प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा होत असल्याने सदरचे तक्रारदार हे दि.28/10/2025 रोजी अरणगाव,ता.जामखेड,जि. अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी भेटणार आहेत. आपणास तेथे जावुन त्यांची तक्रार ऐकुन त्याप्रमाणे लाचेची सापळा कारवाई करावयाची आहे. त्या कारवाईत तुम्ही पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? अशी संमती विचारली असता नमुद पंचांनी त्यास संमती दर्षविली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोना/काळे, पोकाँ/कुळधर व पोकाँ/वाघ यांची पंचांषी ओळख करुन दिली. त्यानंतर दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांना दि. 28/10/2025 रोजी सकाळी 09/00 वा.ला.प्र.वि.कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिल्या.

आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे दि. 28/10/2025 रोजी 09/00 वा. पंच व सापळा पथकातील कर्मचारी कार्यालयात हजर झाले. त्यानंतर आम्ही सोबतचे स्टाफला सापळा कारवाईसाठी लागणारे साहित्य लॅपटॉप, व्हाईस रेकॉर्डर, मेमरीकार्डस्, प्रिंटर, काळे कापड, सिलसाहित्य, पेपर, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा ई. बरोबर घेणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यासह शासकिय वाहन क्र.एम एच-16 सी व्ही- 0919 ने 09.15 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयातुन निघुन नगर- सोलापुर रोडने माहि जळगाव मार्गे अरणगाव, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर या दिषेने जात असताना तक्रारदार यांनी आम्हाला अरणगाव येथील सुरक्षित ठिकाणाचे लोकेषनची माहिती मोबाईल द्वारे दिली त्याआधारे आम्ही 11○:00 वा. सुमारास अरणगाव येथे तक्रारदार थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आलो. तेथे आमचे सुचनेवरुन वाहन चालक पोहेकाँ हारुन शेख यांनी सुरक्षित ठिकाणी शासकीय वाहन उभे केले. त्याठिकाणी एक इसम त्यांचेकडील दुचाकी सह हजर होते. सदर इसम हे शासकिय वाहना जवळ आले. त्यावेळी आम्ही त्या इसमास त्यांचे नावे विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव आकाष संभाजी पवार, वय-27 वर्षे, व्यवसाय-षेती, रा.कवडगाव, ता.जामखेड,जि.अहिल्यानगर असे सांगुन मीच आपणास एका लोकसेवका विरूध्द लाच मागणीची तक्रार सांगितली



Scanned with OKEN Scanner

होती असे कळविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. आतम पवार यांचेशी दोन्ही पंचाची व सापळा पथकातील कर्मचा-यांची आपसात ओळख करुन दिली.आमचे सुचनेवरुन पंचांनी सदर इसमास त्यांचे पुर्ण नांव, पत्ता व तक्रार विचारता त्यांनी त्यांचे नाव वरील प्रमाणे सांगुन, त्यांची तक्रार सांगितली की, "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे राबविली जाणारी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत माझे शेतामधील बोअरवेल येथे सौर कृषी पंप बसविणेकरीता मी दिनांक 06/10/2023 रोजी आ◌ॅनलाईन अर्ज केला होता त्याप्रमाणे मला दिनांक 24/11/2024 रोजी सौरकृषी पंप मंजुर झालेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फतीने मेसेजद्वारे कळविण्यात आले होते व त्याकरीता 32075/- रुपये भरणा करणेकरीता मेसेजद्वारे सांगण्यात आले त्याप्रमाणे मी दिनांक 01/02/2025 रोजी ऑनलाईन 32,075/- रूपये भरलेले होते.त्यानंतर दिनांक 07/09/2025 रोजी मी सौर कृषी पंप बसविणेकरीता शक्ती पंप इं लि. या कंपनीची ऑनलाईन प्रक्रियेद्वारे निवड केली.त्यानंतर म.रा.वि. वि.कं.शाखा कार्यालय,अरणगाव येथील नागरे लाईनमन यांचे हाताखाली काम करणारे कंत्राटि वायरमन ईस्कर हे दिनांक 26/10/2025 रोजी आमचे गावामध्ये येवुन आमचे शेतामध्ये सौर कृषी पंप बसविण्याच्या ठिकाणी आले व मी त्यांना जागा दाखवल्यानंतर त्यांनी जागेची पाहणी केली व त्यांचेकडील मोबाईल मध्ये माझे तसेच त्यांचे फोटो काढले आणि त्यावेळी मी त्यांना विचारले कि,सर्वे पुर्ण झाल्यानंतर किती दिवसांनी सौर कृषी पंप बसवला जातो, त्यावेळी ईस्कर वायरमन म्हणाले कि,मी केलेल्या सर्वेची माहिती नागरे लाईनमन यांचे मोबाईल मधील ला◌ॅगीन आयडी असलेल्या एमएसईबीच्या अ◌ॅप्लीकेशन मध्ये भरुन पुढील प्रक्रिया करायला लागेल त्याकरीता तुम्ही नागरे लाईनमन यं◌ाना संपर्क करा.त्यानंतर दिनांक 27/10/2025 रोजी नागरे लाईनमन यांना माझा मोठा भाउ अमोल पवार यांचे मोबाईल क्रमांकावरून संपर्क करून सौर कृषी पंपाचे सर्वे बाबत माहिती विचारली असता त्यांनी सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वेची प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता 1000/- रूपयांची मागणी करून सदरची रक्कम फोन पे द्वारे पाठविण्यास सांगितली.माझे शेतातील सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वे करण्याकरीता कोणतीही फि देण्याची आवश्यकता नाही. नागरे लाईनमन यांनी आमचेकडे सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वेची प्रक्रिया करून देण्याकरीता 1000/-रुपये लाचेची मागणी करत असल्याचे आमचे लक्षात आले. त्यावेळी आम्ही त्यांना आता पैसे नसल्याचे सांगितले. नागरे लाईनमन यांना मला लाच देण्याची इच्छा नाही.तरी आज दिनांक 28/10/2025 रोजी नागरे लाईनमन यांची म.रा.वि.वि.कं. शाखा कार्यालय,अरणगाव येथे माझे सौर कृषी पंपाचे सर्वेच्या अनुशंगाने भेट घेणार आहे त्यावेळी त्यांनी माझे कडे वरील कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी",अशी तक्रार सांगितली.तक्रारदार श्री.पवार यांनी सांगितलेली तक्रार त्यांना स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार श्री.पवार यांनी स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर तक्रारदार श्री.पवार,दोन्ही पंचांनी व समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री.पवार यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक नागरे यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यावेळी आम्ही लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेका◌ॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री.पवार व दोन्ही पंचांना माहिती समजावून सांगितली.आम्ही व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार श्री.पवार व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. पवार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही,दोन्ही पंच व तक्रारदार श्री.पवार असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले.त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबततक्रारदार श्री.पवार व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या व आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो तक्रारदार श्री.पवार यांचे गळ्यात कोणास दिसणार नाही अशाप्रकारे अडकवुन दिला.आम्ही दिलेल्या सुचने प्रमाणे तक्रारदार श्री.पवार हे पंच नं.1 यांचेसह तक्रारदार श्री.पवार यांचेकडील दुचाकी वाहनाने लोकसेवक नागरे यांची भेट घेण्याकरीता म.रा.वि. वि.कं.मर्या,शाखा कार्यालय,अरणगाव येथे 12/00 वा.सुमारास रवाना झाले. त्यावेळी आम्ही,पंच नं.2 व सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहलो.त्यानंतर 12/30 वा.सुमारास तक्रारदार श्री.पवार व पंच नं.1 असे आम्ही थांबल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.पवार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर आमचे ताब्यात घेवुन बंद केला व पंच नं.1 यांना लोकसेवक नागरे यांची परत येईपर्यंत घडलेल्या घटने विषयी विचारले असता त्यांनी पंच नं.2 यांचे समक्ष सांगितले की, लोकसेवक नागरे यांची म.रा.वि.वि.कं.मर्या,शाखा कार्यालय, अरणगाव येथे तक्रारदार श्री.पवार यांचेसह जावुन भेट घेतल्यानंतर तक्रारदार श्री.पवार हे लोकसेवक नागरे यांचे सोबत सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी झालेल्या सर्वेबाबत चर्चा करत असताना लोकसेवक नागरे यांनी तक्रारदार श्री.पवार यांचे शेतजमीनीमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे राबविली जाणारी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शेतामधील बोअरवेल येथे सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वे करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता तक्रारदार श्री.पवार यांचेकडे 700/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पवार यांना घडले हकिगतीबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 प्रमाणे हकिगत सांगितली त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचांनी व्हाईस रेकॉर्डरमधील लोकसेवक नागरे व तक्रारदार श्री.पवार यांचेमधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ऐकले असता लोकसेवक नागरे यांनी तक्रारदार श्री.पवार यांचे शेतजमीनीमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे राबविली जाणारी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शेतामधील बोअरवेल येथे सौर कृषी पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वे करण्याच्या प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता तक्रारदार श्री.पवार यांचेकडे 700/- रुपये लाचेची मागणी केल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर लोकसेवक नागरे यांना लाच म्हणुन 700/-रुपये रक्कम देण्याचे सर्वानुमते ठरले.लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी तक्रारदार श्री.पवार यांनी त्यांचे बचतीतुन 700/-रुपये त्यात 100/- रुपये दराच्या 07 भारतीय चलनी नोटा, अशी रक्कम हजर केली.आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक आमचे सुचनेवरुन पोकॉ कुळधर यांनी करुन दाखविले. तक्रारदार श्री.पवार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदरचा कागद पंच नं.2 यांचे ताब्यात दिला.सदर लाच रक्कम लोकसेवक नागरे यांना देण्याकरीता तक्रारदार श्री.पवार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली.त्यानंतर आम्ही सापळा कारवाई बाबत तक्रारदार श्री.पवार,दोन्ही पंचास व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या.त्यानंतर लोकसेवक नागरे यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान ते पुर्ण दिवस म. रा. वि. वि. कं. मर्या,शाखा कार्यालय अरणगाव येथे थांबणार असल्याचे त्यांनी तक्रारदार श्री.पवार यांना सांगितलेले असल्याने म. रा. वि. वि. कं.मर्या., शाखा कार्यालय,अरणगाव येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले.त्याप्रमाणे आम्ही व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.पवार यांचे गळयात अडकवला.त्यानंतर तक्रारदार श्री. पवार व पंच क्र. 1 असे तक्रारदार श्री.पवार यांचे दुचाकी वाहनावरुन 13/40 वा. चे सुमारास रवाना केले व आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने त्यांचे मागोमागनिघालो,तक्रारदार श्री.पवार व पंच क्र.1 असे म.रा.वि.वि.कं.मर्या.,शाखा कार्यालय,अरणगाव या कार्यालयाचे बाहेर जावुन सापळा पथक शाखा कार्यालयाचे आजुबाजुला आल्याची खात्री झाल्यानंतर शाखा कार्यालयाचे बाहेर मांडी घालुन बसलेल्या इसमास भेटले व त्यांचेसोबत चर्चा करत असताना तक्रारदार श्री.पवार यांनी लोकसेवक नागरे यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला ती वेळ 13/49 वा.दरम्यानची होती.त्यावेळी आमची व सापळा पथकाची लोकसेवक नागरे यांनी लाच स्विकारल्याची खात्री झाल्यानंतर आम्ही सदर ठिकाणी जावुन पंच नं.1 यांना विचारणा केली असता त्यांनी सदर ठिकाणी हजर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन ते लोकसेवक नागरे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार श्री.पवार यांचेकडुन उजव्या हाताने 700/- रुपये लाच रक्कम स्विकारुन मांडी घालुन बसलेल्या ठिकाणी चटईवर ठेवले असल्याचे सांगितले त्यावेळी लोकसेवक नागरे यांना आम्ही ताब्यात घेतले व पंच नं.02 करवी लोकसेवक नागरे यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत करुन पंच नं.02 यांचेकडील कागदावर नमुद केलेल्या नोटांचे नंबराशी पडताळणी करुन पंच नं.02 यांना लाच रक्कम ताब्यात ठेवणेबाबत सुचना दिल्या.

त्यावेळी आम्ही लोकसेवक नागरे यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुनिल रघुनाथ नागरे, वय-54 वर्षे,धंदा-नोकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, (लाईनमन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कंपनी मर्या.,शाखा कार्यालय, अरणगाव, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर, रा.येसगाव, ता.कोपरगाव,जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.पवार यांना बाजुला थांबण्यास सांगुन लोकसेवक नागरे यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. शाखा कार्यालय,अरणगाव येथील एका कक्षामध्ये आणुन सदर कक्षामध्ये आवश्यक तो अंधार करुन लोकसेवक नागरे यांच्या हाताच्या व त्यांनी स्विकारलेल्या लाचरकमेच्या नोटांच्या अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात आवश्यक त्या तपासण्या केल्या.त्यानंतर तक्रारदार श्री.पवार यांना जामखेड पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगुन आम्ही व सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक नागरे यांना घेवुन जामखेड पोलीस स्टेशन येथे आलो व आम्ही दिलेल्या सुचनाप्रमाणे तक्रारदार श्री.पवार हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक,जामखेड पोलीस स्टेशन यांना पत्र देवुन पंचनाम्याचे कामकाज करण्याकरीता विद्युत जोडणी असलेला कक्ष उपलब्ध करुन घेवुन त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज केले.

तरी दि.28/10/2025 रोजी 12/00 वा. ते 12/30 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक सुनिल रघुनाथ नागरे,वय-54 वर्षे,धंदा-नोकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ,(लाईनमन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कंपनी मर्या.,शाखा कार्यालय, अरणगाव, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर यांनी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तिक फायदा करुन घेण्याचे हेतुने तक्रारदार श्री.आकाश संभाजी पवार, रा.कवडगाव,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर यांचे शेतजमीनीमधील बोअरवेल करीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण



Scanned with OKEN Scanner

कंपनी तर्फे राबविली जाणारी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत कृषी सौर पंप बसविण्याचे ठिकाणी सर्वे करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता पंच साक्षीदारांसमक्ष तक्रारदार श्री आकाश संभाजी पवार यांचेकडे 700/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कंपनी मर्या., शाखा कार्यालय, अरणगाव, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर या ठिकाणी 13/49 वा.दरम्यान पंच साक्षीदारांसमक्ष सदरील लाच रक्कम 700/- रूपये तक्रारदार श्री.आकाश संभाजी पवार यांचेकडुन स्विकारली म्हणुन लोकसेवक लोकसेवक सुनिल रघुनाथ मापरे,वय-54 वर्षे, धंदा-नोकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, (लाईनमन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कंपनी मर्या.,शाखा कार्यालय, अरणगाव, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष दिनांक 28/10/2025

( राजु बबन आल्हाट )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dashrath nimba choudhari(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो ना /२०८७ आर.एन.याव
पोलिस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dashrath nimba cho
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with OKEN Scanner